मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल
बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२
www.newsexpressmarathi.com
» पुणे, पिंपरी-चिंचवड
» सोमवार, दि. 10 ऑगस्ट 2026 | पान- 1

# पिंपरी-चिंचवडच्या डीपीवर 56 हजार 779 हरकती

## 17 आरक्षणांवरच 37 हजारांहून अधिक आक्षेप; सात सदस्यीय समितीच्या निर्णयाकडे शहराचे लक्ष

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेने प्रसिद्ध केलेल्या प्रारूप सुधारित विकास आराखड्यावर (डीपी प्लॅन) सुनावणी घेण्यात येत आहे. डीपीवर तब्बल 56 हजार 779 हरकती दाखल झाल्या आहेत. त्यात सर्वाधिक हरकती पिंपरी येथील भीमसृष्टीशेजारील म्युन्सिपल पर्पज, पोलिस स्टेशन व बसटर्मिनलचे आरक्षण, तळवडे, थेरगाव, चिंचवड, पिंपरी व वाकड येथील 18 व 24 मीटर रस्तारुंदीकरण, चिखली, किवळे व सांगवीतील दफनभूमी, मोशीतील कत्तलखाना, चऱ्होली स्टेडियम तसेच, एचसीएमटीआर (रिंगरोड) मार्ग आणि पूररेषेबाबत मोठ्या संख्येने हरकती देण्यात आल्या आहेत. त्याबाबत सुनावणी समिती काय निर्णय घेते याकडे शहराचे लक्ष लागले आहे.



महापालिकेच्या क्षेत्रासह पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडून वर्ग करण्यात आलेल्या क्षेत्राचा एकत्रित प्रारूप सुधारित डीपी महापालिकेने तयार केला आहे. शहरातील एकूण 28 गावांच्या एकूण 173.24 चौरस किलोमीटर क्षेत्रफळाच्या या आराखड्यात शहरातील विविध प्रकल्पांसाठी आरक्षणे तसेच, सार्वजनिक सेवा व सुविधांसह नवीन प्रकल्प प्रस्तावित करण्यात आले आहेत. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1996, कलम 26 (1) अन्वये पिंपरी-चिंचवड शहर व विशेष नियोजन प्राधिकरणाचे क्षेत्राची प्रारूप सुधारित डीपी 14 मे 2025 ला प्रसिद्ध करण्यात आला.

डीपीत अनेक ठिकाणी चुकीच्या पद्धतीने आरक्षण प्रस्तावित केल्याने नागरिकांसह शेतकरी व जागामालकांनी मोठ्या संख्येने हरकती नोंदविल्या आहेत. या कारणांने डीपी विरोधात हरकतींची संख्या वाढली आहे. 15 मे 2025 ते 14 जुलै 2025 या साठ दिवसांच्या मुदतीमध्ये तब्बल 56 हजार 779 हरकती दाखल झाल्या.

त्यावर तब्बल एका वर्षानंतर 3 ऑगस्टपासून सुनावणी घेण्यात येत आहे. त्यात केवळ 17 आरक्षणांवर तब्बल 37 हजार 479 हरकती आहेत. मोठ्या संख्येने आलेल्या हरकतींवर एकत्रित सुनावणी घेण्यात येत आहे. त्या हरकतींवर सात सदस्यीय समिती काय निर्णय घेते, नागरिकांच्या रोष लक्षात घेऊन प्रस्तावित आरक्षणात बदल केला जाणार का, याची उत्सुकता निर्माण झाली आहे.

### डीपी सुनावणीस हरकतदारांचा अल्पप्रतिसाद

**» वर्षभराच्या विलंबानंतर प्रारुप सुधारित डीपीवर 3 ऑगस्टपासून सुनावणी घेण्यात येत आहे. मात्र, सुनावणीस प्रत्यक्षात हजर राहण्याची संख्या खूपच अल्प आहे. दोन हजार 500 लोकांना नोटीस दिल्यानंतर केवळ 150 ते 200 लोक हजर उपस्थित राहत आहेत. तब्बल वर्षानंतर ही प्रक्रिया सुरू झाल्याने सुनावणीसाठी नागरिकांचा उत्साह दिसून येत नसल्याचे चित्र आहे. ती सुनावणी आकुर्डी येथील ग. दि. माडगुळकर नाट्यगृहात नोव्हेंबर 2026 पर्यंत चालणार आहे.**

# भक्ती-शक्ती चौकात अण्णाभाऊ साठे प्रबोधन पर्वानिमित्त बहारदार काव्यसंमेलन उत्साहात संपन्न

## निगडीतील प्रबोधन पर्वात निमंत्रित कवींचे बहारदार काव्यसंमेलन; 'अण्णाभाऊंची लेखणी'सह विविध कवितांना रसिकांची दाद

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयोजित साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे प्रबोधन पर्व-२०२६ अंतर्गत भक्ती-शक्ती चौक, निगडी येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक परिसरात निमंत्रित कवींचे बहारदार काव्यसंमेलन उत्साहात पार पडले. या काव्यसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कवी तथा पत्रकार पितांबर लोहार होते.



अध्यक्षीय भाषणात पितांबर लोहार यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. अण्णाभाऊंच्या साहित्याने आणि शाहिरीने समाजप्रबोधनाचे कार्य करत संयुक्त महाराष्ट्र चळवळीला बळ दिल्याचे त्यांनी नमूद केले.

या काव्यसंमेलनात सहभागी कवींनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्य, साहित्य, सामाजिक बांधिलकी आणि संघर्षमय प्रवासावर आधारित विविध कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कवी सुनील भिसे, किशोर केदारी, विशाल कसबे, अनिल दीक्षित, दीपेश सुराणा, सुहास घुमरे, दत्तू ठोकळे, महेंद्र पाटोळे, आत्माराम हारे, संजय साळुंखे, विनोद अष्टूल, विलास रुपटक्के, पुरुषोत्तम हिंगणकर, विजय कांबळे, देवेंद्र गावंडे, अशोक टाकळे, अरुण कडलक, लहू साळवे, नितीन घोलप तसेच कवयित्री फुलवती जगताप, आशा शहाणे, केसरताई लांडगे, वर्षा सोनवणे, नलिनी सोनवणे, राजेश्वरी म्हैसने आणि पिया सोनवणे यांनी आपल्या उत्कृष्ट रचनांद्वारे अण्णाभाऊंना अभिवादन केले.

कवी पितांबर लोहार यांनी सादर केलेल्या 'अण्णाभाऊंची लेखणी' या कवितेला विशेष दाद मिळाली. तर सुनील भिसे यांच्या 'दीड दिवसाची शाळा', किशोर केदारी यांच्या 'समता', अनिल दीक्षित यांच्या 'अण्णाभाऊंची लेखणी', दीपेश सुराणा यांच्या 'लोकशाहीर अण्णाभाऊंना मानाचा मुजरा' आणि विशाल कसबे यांच्या 'अण्णांच्या कवितांना सलाम' या कवितांनी कार्यक्रमात रंगत आणली.

### अण्णाभाऊंच्या लेखणीला काव्यसंमेलनातून सलाम

**» शहरातील पहिला प्रकल्प: हा उपक्रम शहरातील झोपडपट्टी, तसेच इतर सर्व भागातील कचरा व्यवस्थापनासाठी राबविला जाणारा पहिलाच अभिनव प्रकल्प आहे. वैज्ञानिक दृष्टीकोन: कचरा व्यवस्थापनाची प्रभावी अंमलबजावणी, पर्यावरण संवर्धन आणि नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी हा प्रकल्प वैज्ञानिक पद्धतीने राबविला जात आहे. लोकसहभाग: हा केवळ स्वच्छतेचा उपक्रम नसून लोकसहभागातून उभारला जाणारा एक शाश्वत विकासाचा आदर्श पॅटर्न आहे.**

# मावळ गोळीबाराला 15 वर्षे; पवना बंदिस्त जलवाहिनीचा विरोध कायम

## समर्थक-विरोधक सत्तेत एकत्र; शेतकऱ्यांना बैठकीत गुंतवून प्रशासकीय प्रक्रिया सुरू असल्याचा आरोप, राजू शेट्टींची आंदोलनाची घोषणा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पावरून घडलेल्या मावळ गोळीबार प्रकरणाला आज १५ वर्षे पूर्ण झाली असली, तरी आजही मावळातील शेतकऱ्यांचा विरोध ठाम आहे; परंतु या प्रकल्पाचे समर्थन करणारे आणि विरोध करणारे आज एकत्र झाले आहेत. शासनाच्या माध्यमातून हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी घाट घालत असल्याचे दिसत आहे.

तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संकल्पनेतून पवना धरणातून थेट बंद जलवाहिनीद्वारे पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा करण्याच्या नव्या प्रकल्पाला मान्यता देण्यात आली होती; परंतु पवना धरणातून बंद पाइपलाइनद्वारे पाणी नेण्यास मावळ तालुक्यातील भारतीय किसान संघाच्या वतीने तीव्र विरोध करण्यात आला होता. त्यानंतर तालुक्यातील भाजप, शिवसेना या पक्षांनीही या विरोधी आंदोलनात सहभाग घेतला.



### शेतकरी बैठकांमध्ये गुंग; प्रशासन प्रक्रियेत दंग

» सद्यस्थितीत मावळातील शेतकऱ्यांचा आजही या प्रकल्पाला तीव्र विरोध आहे, परंतु या प्रकल्पाला समर्थन करणारे आणि यापूर्वी तीव्र विरोध करणारे आज महायुती सरकारमध्ये एकत्र असून, सरकारनेच हा प्रकल्प पूर्ण करण्याचा घाट घातला आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत नुकतीच एक बैठकही झाली असून, शेतकऱ्यांना विश्वासात घेतल्याशिवाय कुठलाही निर्णय होणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. एका बाजूला शेतकऱ्यांना बैठकांमध्ये गुंतवून दुसरीकडे प्रशासकीय प्रक्रिया मात्र पूर्ण केली जात आहे.

जलवाहिनीच्याविरोधात गहूंजे येथे केलेले पहिले आंदोलन पोलिस बळाच्या जोरावर हाणून पाडण्यात आले होते. त्यानंतर ९ ऑगस्ट २०११ रोजी मावळ बंद पुकारण्यात आला व त्याच दिवशी मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर बौर येथे रास्ता रोको करण्यात आला. या आंदोलनास हिंसक वळण लागले. या वेळी पोलिसांनी केलेल्या गोळीबारात कांताबाई ठाकर, मोरेश्वर साठे व शामराव तुपे हे तीन शेतकरी मृत्युमुखी पडले. तर, अनेक जण जखमी झाले. या मावळ गोळीबार प्रकरणाचे पडसाद केंद्र व राज्य पातळीवर उमटले आणि राज्य शासनाने या प्रकल्पाला तात्पुरती स्थगिती दिली.

### प्रकल्प रद्द होण्याऐवजी स्थगिती उठली

» त्यानंतरच्या १४ वर्षांच्या काळात पुलाखालून बरेच पाणी निघून गेले आहे. राज्यात काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी, भाजप-शिवसेना युती, काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना महाविकास आघाडी, शिवसेना शिंदे गट, भाजप, राष्ट्रवादी अजित पवार गट यांची महायुती अशी तीन सरकारे सत्तेवर येऊन गेली. आताही महायुती सरकार सत्तेवर आहे. त्यामुळे समर्थन करणारे, विरोध करणारे सगळेच सत्तेवर आले; परंतु हा प्रकल्प रद्द होऊ शकला नाही. याउलट वर्षांपूर्वी भाजप, शिवसेना व राष्ट्रवादी असे तीनही पक्ष सत्तेत आले आणि हा प्रकल्प रद्द होण्याऐवजी तब्बल १२ वर्षे असलेली स्थगिती उठविण्यात आली. शासनाने स्थगिती उठविण्याचा घेतलेला निर्णय मागे घ्यावा, यासाठीही वडगाव मावळ येथे सर्वपक्षीय मोठे आंदोलन झाले; परंतु पुढे याबाबत कोणतीच कार्यवाही झाली नाही. याउलट प्रकल्प पूर्ण करण्याच्यादृष्टीने प्रयत्न सुरू झाले.

### आता या लढ्यात राजू शेट्टींची एन्ट्री

» दरम्यान, पवना धरणग्रस्त संयुक्त समितीच्या माध्यमातून धरणग्रस्तांचे पुनर्वसन व बंदिस्त जलवाहिनी प्रकल्प रद्द करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असून, या लढ्यामध्ये आता स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांची एन्ट्री झाली आहे. वडगाव मावळ येथे नुकतीच पत्रकार परिषद घेऊन शेट्टी यांनी २ ऑक्टोबरला या दोन्ही प्रश्नासाठी लॉगमार्च काढून पवना धरणात जलसमाधी आंदोलन करणार असल्याचे जाहीर केले आहे.

# लोणावळ्यात 'आखाड' पार्ट्यांचा जल्लोष; पर्यटकांच्या गर्दीने पर्यटनस्थळे गजबजली

## हॉटेल, फार्महाऊस आणि खासगी बंगले हाऊसफुल्ल; भुशी धरणासह विविध पर्यटनस्थळांवर पोलिसांचा बंदोबस्त

**पिंपरी | प्रतिनिधी**

आखाड पार्ट्या करण्यासाठी लोणावळा शहरात पर्यटकांची मोठी गर्दी झाली आहे. पर्यटकांच्या या गर्दीमुळे शहरातील सर्व पर्यटनस्थळे गजबजली असून, हॉटेल, फार्महाऊस व खासगी बंगले पर्यटकांनी भरले आहेत.

पुढील आठवड्यामध्ये श्रावण महिना सुरू होणार आहे. हा महिना सुरू होण्यापूर्वी आखाड पार्ट्या सर्वत्र जोरात चालतात. पर्यटनस्थळ असलेल्या लोणावळा शहर व आजूबाजूच्या ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड व अन्य भागांमधून पर्यटक दाखल झाले आहेत. अनेक तरुण-तरुणींचे ग्रुप खासगी बंगल्यांमध्ये मुक्कामी आहेत.



या ठिकाणी मोठ्या प्रमाणात आखाड पार्ट्या रंगल्या असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. लोणावळा शहरामध्ये दीडशेहून अधिक लहान-मोठी हॉटेल्स आहेत. तर, हजारो बंगले आहेत. बंगल्यांमध्ये फार नियमांचे पालन करावे लागत नसल्यामुळे पर्यटक हॉटेलमध्ये राहण्याऐवजी खासगी बंगल्यांना प्राधान्य देत आहेत. या ठिकाणी स्विमिंग पूलमध्ये भिजण्याचा आनंद घेत पार्ट्या रंगत आहेत.

शहरातील वाहतूक कोंडी नियंत्रणात ठेवण्यासाठी व पर्यटनस्थळांवर सुरक्षिततेसाठी पुणे ग्रामीण पोलिसांकडून पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. लोणावळा शहर पोलिस तसेच ग्रामीणचे पोलिस कर्मचारी हेदेखील वाहतूक नियंत्रण व पर्यटनस्थळांवर कायदा व सुव्यवस्थेसाठी तैनात आहेत. मात्र, पर्यटकांची व पर्यटकांच्या वाहनांची संख्या मोठी असल्यामुळे वाहतूक नियोजन कोलमडले आहे. पर्यटनस्थळांवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये, याकरिता पोलिस तैनात आहेत. काही पोलिस मित्रदेखील पोलिसांना या कामी मदत करत आहेत.

### ठिकठिकाणी वाहतूक कोंडी

» मागील दोन-तीन दिवसांपासून शहरामध्ये पावसाचा जोर कमी झाला आहे. त्यामुळे हिरव्यागार निसर्गाचा आनंद घेत पर्यटनस्थळांवर व डोंगर भागामध्ये पर्यटक फिरताना दिसत आहेत. सहारा पुन्हा समोरील धबधबे, भूशी धरण, टायगर पॉईंट, शिवलिंग पॉईंट, खंडाळा राजमाची पॉईंट, ड्युक्स नोज पॉइंट, मिसिंग लिंक पॉईंट, तुंगार्ली धरण, भाजे लेणी व धबधबा, कार्ला लेणी हा परिसर पर्यटकांनी गजबजला आहे. पर्यटकांच्या या गर्दीमुळे शहरामध्ये मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली असून, नागरिकांना या कोंडीचा मनस्ताप सहन करावा लागतो आहे. पर्यटकांनादेखील पर्यटनस्थळासाठी काही तास वाहतूक कोंडीतून जावे लागत आहे.

# शहरी गरीब योजनेच्या विकेंद्रीकरणाला प्रशासनाचा विरोध

## 15 क्षेत्रीय कार्यालयांत स्वतंत्र यंत्रणा उभारण्यासाठी 75 ते 90 कर्मचाऱ्यांची गरज; संगणक, प्रिंटरसह अतिरिक्त खर्चाचा बोजा

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या स्वर्गीय अजितदादा पवार शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजनेचे काम १५ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये विकेंद्रित करण्याचा स्थायी समितीचा निर्णय असताना, महापालिका प्रशासनाने मात्र या निर्णयाला अप्रत्यक्षपणे विरोध केला आहे. प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयात स्वतंत्र यंत्रणा उभारण्यासाठी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ, संगणक,

प्रिंटर व इतर साहित्य लागणार असल्याने ही प्रक्रिया क्षेत्रीय कार्यालय स्तरावर सुरू करणे उचित ठरणार नसल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले आहे. या योजनेशी संबंधित सर्व प्रशासकीय कामकाज, कागदपत्रांची पडताळणी आणि अंतिम मंजुरीची प्रक्रिया १५ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये स्वतंत्र विभाग स्थापन करून राबवावी, असा ठराव क्र. १२ जून २०२६ रोजी मंजूर केला होता,

या ठरावाच्या अंमलबजावणीबाबत आयुक्तांनी नगरसचिव कार्यालयाकडे आपला अभिप्राय पाठविला आहे. अभिप्रायानुसार, सध्या शहरी गरीब योजनेचे सभासदत्व देण्याची प्रक्रिया सप्टेंबर २०२२ पासून संगणकीकृत करण्यात आली आहे. नागरिकांनी आवश्यक कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड केल्यानंतर त्यांची लेव्हल वन आणि लेव्हल टू अशा दोन टप्प्यांत पडताळणी केली जाते.




### संगणकीकृत प्रक्रियेमुळे कामकाज सुलभ

» शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजनेअंतर्गत सभासदत्व देण्याची प्रक्रिया सप्टेंबर २०२२ पासून पूर्णपणे संगणकीकृत करण्यात आली आहे. नागरिक आवश्यक कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड करतात. त्यानंतर लेव्हल वन आणि लेव्हल टू अशा दोन टप्प्यांत कागदपत्रांची पडताळणी होते. लिपिक टंकलेखककांकडून प्राथमिक तपासणी केली जाते, तर संबंधित विभागाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून अंतिम मान्यता दिली जाते. त्यानंतर संगणकीय पद्धतीने सभासदत्व कार्ड तयार होते. एप्रिल आणि मे महिन्यात दररोज सुमारे २५० ते ३०० कार्ड तयार होत होते. जूनपासून ही संख्या ८० ते १०० पर्यंत आली आहे. त्यामुळे सध्याची मध्यवर्ती व्यवस्था अधिक कार्यक्षम असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे.

लिपिक टंकलेखककांकडून प्राथमिक पडताळणी, तर संबंधित विभागाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून अंतिम मान्यता दिली जाते. त्यानंतर संगणकीय पद्धतीने सभासदत्व कार्ड तयार होते. एप्रिल आणि मे महिन्यात दररोज सुमारे २५० ते ३०० कार्ड तयार होतात. जूनपासून ही संख्या दररोज ८० ते १०० पर्यंत येते.

सध्या मध्यवर्ती कार्यालयात दररोज सरासरी ८० ते १०० कार्ड तयार होत असल्याने १५ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये ही प्रक्रिया सुरू केल्यास प्रत्येक कार्यालयात सरासरी सहा कार्डांची प्रक्रिया हाताळण्यासाठी पाच ते सहा कर्मचाऱ्यांची स्वतंत्र टीम आवश्यक ठरेल. त्यानुसार १५ कार्यालयांसाठी सुमारे ७५ ते ९० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी लागेल. त्याशिवाय प्रत्येक कार्यालयात संगणक, प्रिंटर आणि अन्य साहित्य उपलब्ध करून द्यावे लागणार आहे.

### शहरी गरीब योजनेला प्रशासनाचा 'ब्रेक'

» महापालिकेच्या स्वर्गीय अजितदादा पवार शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजनेचे काम १५ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये विकेंद्रित करण्याचा स्थायी समितीचा निर्णय झाला असला, तरी प्रशासनाने त्याबाबत अनुकूल भूमिका घेतलेली नाही. प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयात स्वतंत्र यंत्रणा उभारण्यासाठी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ आणि संगणकीय साधनांची आवश्यकता भासणार आहे. त्यामुळे ही प्रक्रिया क्षेत्रीय कार्यालय स्तरावर सुरू करणे योग्य ठरणार नसल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले आहे. योजनेचे प्रशासकीय कामकाज, कागदपत्रांची तपासणी आणि अंतिम मंजुरी सध्या मध्यवर्ती पद्धतीने केली जाते. त्यामुळे विकेंद्रीकरणामुळे होणारा अतिरिक्त खर्च आणि मनुष्यबळाचा ताण लक्षात घेता प्रशासनाने स्थायी समितीच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

### १५ कार्यालयांसाठी ७५ ते ९० कर्मचारी

» शहरी गरीब योजनेचे काम १५ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये सुरू केल्यास प्रत्येक कार्यालयासाठी स्वतंत्र कर्मचारी नियुक्त करावे लागतील. सध्या मध्यवर्ती कार्यालयात दररोज सरासरी ८० ते १०० सभासदत्व कार्ड तयार होतात. हीच प्रक्रिया १५ कार्यालयांमध्ये विभागल्यास प्रत्येक कार्यालयात सरासरी सहा कार्डांची प्रक्रिया होईल. मात्र, त्यासाठी प्रत्येक कार्यालयात पाच ते सहा कर्मचाऱ्यांची स्वतंत्र टीम आवश्यक ठरणार आहे. परिणामी, सर्व १५ क्षेत्रीय कार्यालयांसाठी सुमारे ७५ ते ९० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी लागेल. याशिवाय संगणक, प्रिंटर आणि इतर आवश्यक साहित्य खरेदी करावे लागणार आहे.

# पीएमआरडीएचा नवा स्ट्रक्चरल प्लॅन येईपर्यंत जुन्या रस्ते-आरक्षणांचा विचार

## 18 मीटर किंवा त्याहून अधिक रुंदीचे प्रस्तावित रस्ते व मोठी आरक्षणे अबाधित ठेवून बांधकाम परवानग्या; जमीनमालकांचा आक्षेप

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) आपल्या हद्दीचा नवीन स्ट्रक्चरल प्लॅन तयार करण्याचे काम हाती घेतले आहे. मात्र, हा नवीन प्लॅन तयार होण्यासाठी काही कालावधी लागणार आहे.

त्यामुळे सद्यस्थितीत बांधकाम परवानगी देताना यापूर्वी रद्द झालेल्या प्रारुप विकास आराखडा (डीपी) मधील रस्ते आणि प्रस्तावित आरक्षणे विचारात घ्यावी, असे परिपत्रक प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनी जारी केले आहे.

या परिपत्रकानुसार नवीन स्ट्रक्चरल प्लॅन चा प्रारूप आराखडा प्रसिद्ध होईपर्यंत, रद्द झालेल्या डीपीतील १८




मीटर किंवा त्यापेक्षा अधिक रुंदीचे प्रस्तावित रस्ते, प्रादेशिक अथवा नगरस्तरीय परिवहन आरक्षणे आणि ३ हेक्टर किंवा त्याहून अधिक क्षेत्रफळाची प्रादेशिक,नगरस्तरीय उद्याने अबाधित ठेवूनच विकास परवानग्यांची पुढील कार्यवाही केली जाईल, असे म्हटले आहे.

३ हेक्टरपेक्षा कमी क्षेत्रफळाची किंवा स्थानिक पातळीवरील उद्याने आणि सार्वजनिक सुविधा आरक्षणांमध्ये बदल करून विकास परवानगीचा प्रस्ताव सादर करण्याची मुभा विकसकांना असेल. मात्र, यासाठी नगररचना अधिकाऱ्यांचा अभिप्राय आणि आयुक्तांची मंजुरी अनिवार्य राहील.

नव्या स्ट्रक्चरल प्लॅनमध्ये किमान १८ मीटर रुंदीचे रस्ते अपेक्षित आहेत; परंतु रद्द डीपीमध्ये काही ठिकाणी १८ मीटरपेक्षा कमी रुंदीचे रस्ते प्रस्तावित होते. त्या रस्त्यालगत यापूर्वी मंजूर झालेल्या विकास परवानग्यांचा विचार करून निर्णय घेतला जाईल, असेही परिपत्रकात नमूद केले आहे.

### मोठी उद्याने आणि परिवहन आरक्षणे कायम

» रद्द झालेल्या विकास आराखड्यातील प्रादेशिक अथवा नगरस्तरीय परिवहन आरक्षणे तसेच तीन हेक्टर किंवा त्याहून अधिक क्षेत्रफळाची प्रादेशिक, नगरस्तरीय उद्याने सध्या अबाधित ठेवण्याचा निर्णय पीएमआरडीएने घेतला आहे. त्यामुळे अशा आरक्षणांच्या जागांवर विकास परवानगी देताना संबंधित तरतुदींचा विचार करावा लागणार आहे. मात्र, तीन हेक्टरपेक्षा कमी क्षेत्रफळाची किंवा स्थानिक पातळीवरील उद्याने आणि सार्वजनिक सुविधा आरक्षणांमध्ये बदल करून विकास प्रस्ताव सादर करण्याची मुभा विकसकांना देण्यात आली आहे. त्यासाठी नगररचना अधिकाऱ्यांचा अभिप्राय आणि पीएमआरडीए आयुक्तांची मंजुरी आवश्यक राहणार आहे.

# पुणेकरांची ‘MH 12’ ओळख कायम! सप्टेंबरपासून वाहनांना मिळणार देशातील सर्वात अनोखा नंबर

## पुण्याची जुनी ओळख कायम ठेवण्यासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयाचा निर्णय; देशात पहिल्यांदाच अशा स्वरूपाचा नंबर मिळणार.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणेकरांची अस्मिता आणि वाहनांची मुख्य ओळख बनलेली एमएच १२ (MH 12) ही वाहन नोंदणी सिरीज सध्या ऐतिहासिक बदलाच्या उंबरठ्यावर उभी आहे. पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयात सध्या सुरू असलेली दोन अक्षरांची अंतिम मालिका म्हणजेच (एमएच १२ झेडझेड) येत्या दोन ते तीन आठवड्यात संपेल. त्यामुळे ही सिरीज संपल्यानंतर पुढे काय, याकडे संपूर्ण पुणेकरांचे लक्ष लागले असून,

पुण्याची एमएच १२ ही ओळख कायम ठेवून आता एमएच १२ १ए (MH 12 1A) अशा स्वरूपात नवीन मालिका सुरू होण्याची शक्यता आहे. याबाबत पुणे आरटीओकडून शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. पुणे आरटीओमध्ये दोन अक्षरांची वाहन नोंदणी जवळपास १९९२ मध्ये सुरू झाली. AA ते ZZ ही संपूर्ण मालिका संपण्यासाठी साधारण ३४ वर्षांचा (१९९२ ते २०२६) कालावधी लागला.

पुणे आरटीओमध्ये दुचाकी आणि चारचाकी वाहनांसाठी स्वतंत्र सिरिज चालवल्या जातात. त्यामध्ये दुचाकींसाठी झेड वाय (ZY) ही सिरीज ऑगस्ट २०२६ च्या पहिल्या आठवड्यात संपली आणि झेडझेड (ZZ) ही शेवटची सिरीज संपत आहे. चारचाकी वाहनांची झेडडब्ल्यू (ZW) ही सिरीज सुरू असून ती पुढील दोन महिन्यांत संपण्याचा अंदाज आहे.

पुणे आरटओसाठी तीन अक्षरांची (उदा. AAA) सिरीज नंबर प्लेट रेकग्निशन कॅमेऱ्यांना टिपण्यात आणि ई-चलन प्रणालीत अडचणी निर्माण करणारी होती. याशिवाय पुणेसाठी एमएच ६१ (MH 61) हा नवीन कोड देण्याची चर्चा होती. मात्र, पुणे शहराची MH 12 ही जुनी ओळख पुसली गेली असती.




### ‘एमएच १२ १ए’ची अनोखी मालिका

» एमएच १२ ची पारंपरिक अक्षरांची मालिका संपल्यानंतर पुण्याची ओळख कायम ठेवण्यासाठी एमएच १२ १ए (MH 12 1A) ही अल्फा-न्यूमेरिक मालिका सुरू करण्याचा प्रस्ताव आहे. या मालिकेमध्ये नव्या वाहनांना MH 12 1A 0001 अशा स्वरूपाचे क्रमांक मिळण्याची शक्यता आहे. तीन अक्षरांची एएए (AAA) सिरीज सुरू केल्यास नंबर प्लेट रेकग्निशन कॅमेरे आणि ई-चलन प्रणालीसमोर अडचणी निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती. त्यामुळे अल्फा-न्यूमेरिक पद्धतीचा पर्याय पुढे आला. पुणे आरटीओने याबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविला असून, केंद्राच्या मंजुरीनंतर ही नवीन पद्धत लागू होणार आहे.

### एमएच १२ ची ३४ वर्षांची वाटचाल

»पुणेकरांची ओळख बनलेली एमएच १२ वाहन नोंदणी सिरीज आता ऐतिहासिक टप्प्यावर पोहोचली आहे. पुणे आरटीओमध्ये दोन अक्षरांची वाहन नोंदणी सिरीज साधारण १९९२ मध्ये सुरू झाली होती. त्यानंतर एए (AA) पासून झेडझेड (ZZ) पर्यंतच्या सर्व मालिका पूर्ण होण्यासाठी तब्बल ३४ वर्षांचा कालावधी लागला. सध्या दुचाकी वाहनांसाठी सुरू असलेली झेडझेड (ZZ) ही अंतिम मालिका संपण्याच्या मार्गावर आहे. चारचाकी वाहनांसाठी झेडडब्ल्यू (ZW) सिरीज सुरू असून तीही पुढील दोन महिन्यांत संपण्याचा अंदाज आहे. त्यामुळे पुण्याच्या वाहन नोंदणी व्यवस्थेत आता मोठा बदल होणार आहे.

### मंजुरी रखडल्यास वाहन नोंदणीला ब्रेक

» नवीन एमएच १२ १ए मालिकेला केंद्र सरकारकडून वेळेत मंजुरी न मिळाल्यास पुण्यातील नवीन वाहनांच्या नोंदणीवर तात्पुरता परिणाम होण्याची शक्यता आहे. वाहन पोर्टलच्या डिजिटल डेटाबेसमध्ये आवश्यक बदल आणि अंतिम मंजुरी वेळेत न झाल्यास वाहन खरेदीदारांना नोंदणीसाठी प्रतीक्षा करावी लागू शकते. त्याचा थेट परिणाम आरटीओच्या महसुलावरही होऊ शकतो. पुण्याचा एमएच १२ हा कोड कायम ठेवण्यासाठी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली होती. त्यानंतर एमएच १२ कायम ठेवण्यास तत्त्वतः मान्यता मिळाल्याचे सांगण्यात आले. आता अंतिम शिक्कामोर्तबाची प्रतीक्षा आहे.

# शेतात अचानक बिबट्याचा हल्ला; शेतकरी थोडक्यात बचावला, पाठीवर नखांचे ओरखडे

## फुरसुंगीतील झेंडेवस्ती येथे शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यावर बिबट्याने हल्ला केला. नागरिक धावून आल्याने शेतकरी थोडक्यात बचावला.

**पुणे | प्रतिनिधी**

शेतात काम करत असताना दबा धरून बसलेल्या बिबट्याने शेतकऱ्यावर झडप घातल्याची थरारक घटना फुरसुंगी परिसरातील वडकीनाला-गायदरा येथील झेंडेवस्ती येथे शनिवारी सकाळी घडली. या हल्ल्यात हनुमंत सुरेश झेंडे यांच्या पाठीवर बिबट्याच्या नखांचे ओरखडे पडले असून, नागरिकांनी वेळीच धाव घेतल्याने त्यांचा जीव थोडक्यात बचावला.

मिळालेल्या माहितीनुसार, हनुमंत झेंडे हे शनिवारी सकाळी साडेसातच्या सुमारास नेहमीप्रमाणे शेतात काम करत होते. यावेळी शेत परिसरात दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक त्यांच्यावर झडप घातली. बिबट्याने हल्ला केल्याने झेंडे यांनी आरडाओरड करण्यास सुरुवात केली.

त्यांचा आवाज ऐकून शेजारील नागरिक तातडीने मदतीसाठी घटनास्थळी धावले. नागरिकांची चाहूल लागताच बिबट्याने तेथून पळ काढला. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. मात्र, या हल्ल्यात झेंडे यांच्या पाठीवर बिबट्याच्या नखांचे ओरखडे पडले आहेत.

दरम्यान, झेंडेवस्ती परिसरात गेल्या आठ ते दहा दिवसांपासून दोन बिबट्यांचा वावर असल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी दिली आहे. त्यामुळे परिसरातील शेतकरी आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

शेत परिसरात बिबट्याचा वारंवार वावर होत असल्याने वन विभागाने तातडीने पाहणी करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, तसेच बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.



### बिबट्याच्या हल्ल्यात शेतकरी जखमी

» फुरसुंगी परिसरातील वडकीनाला-गायदरा येथील झेंडेवस्ती येथे शेतात काम करणाऱ्या हनुमंत सुरेश झेंडे यांच्यावर बिबट्याने अचानक हल्ला केला. शनिवारी सकाळी साडेसातच्या सुमारास ही घटना घडली. झेंडे शेतात काम करत असताना दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्यांच्यावर झडप घातली. त्यांनी आरडाओरड केल्यानंतर शेजारील नागरिक मदतीसाठी धावून आले. नागरिकांची चाहूल लागताच बिबट्या पळून गेल्याने मोठा अनर्थ टळला. या हल्ल्यात झेंडे यांच्या पाठीवर बिबट्याच्या नखांचे ओरखडे पडले आहेत. परिसरात गेल्या आठ-दहा दिवसांपासून दोन बिबट्यांचा वावर असल्याने शेतकरी आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. वन विभागाने तातडीने पाहणी करून बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.